अधीक्षक अभियंता, धुळे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, धुळे अंतर्गत, कार्यकारी अभियंता, गिरणा नदी खोरे प्रकल्प विभाग, नाशिक व त्यांचे अंतर्गत ५ उपविभागांच्या नियत अस्थायी आस्थापनेवरील १२४ व रुपांतरीत अस्थायी आस्थापनेवरील २५ पदांना दि. ०१/०१/२०१८ ते दि. २८/०२/२०१८ पर्यंत या कालावधीकरीता मुदतवाढ...

महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग,

शासन निर्णय क्र. मुदतवाढ -०११७/प्र.क्र.५७/२०१७/मोप्र-१,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,

दिनांक :- १ फेब्रुवारी, २०१८

वाचावे : १) शासन निर्णय क्र. मुदतवाढ- ०११६/प्र.क्र.५७/२०१७/मोप्र-१, दिनांक १०/१०/२०१७.

२) अधीक्षक अभियंता, धुळे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, धुळे यांचे पत्र क्र.धुपाप्रमंधु/आ-३/५३९/सन २०१८, दिनांक २३/०१/२०१८.

शासन निर्णय :

अधीक्षक अभियंता, धुळे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, धुळे यांचे अधिनस्त कार्यकारी अभियंता, गिरणा नदी खोरे प्रकल्प विभाग,नाशिक व त्यांचे अखत्यारीतील ५ उप विभागांतर्गत नियत अस्थायी आस्थापनेपवरील १२४ पदांना व रुपांतरीत अस्थायी आस्थापनेवरील २५ पदांना दि.०१/०१/२०१८ ते दि. २८/०२/२०१८ पर्यंत या कालावधीकरीता मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. नियत अस्थायी आस्थापनेवरील पदांवर खर्च हा "मागणी क्रमांक आय-५ (नियत अस्थायी आस्थापना) ४७०१-मोठे व मध्यम पाटबंधारे यावरील भांडवली खर्च, (१९०) सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूका, (०४) वेतनावरील खर्चासाठी भाग भांडवली अंशदान, (०४)(०४) तापी पाटबंधारे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान, (४७०१ आय १९८)" या लेखाशिर्षाखालील मंजूर अनुदानातून भागविण्यांत यावा.

तसेच रुपांतरीत अस्थायी आस्थापनेवरील खर्च हा "मागणी क्रमांक आय-५ (रुपांतरीत अस्थायी आस्थापना) ४७०१- मोठे व मध्यम पाटबंधारे यावरील भांडवली खर्च, (१९०) सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणुका, (०२) योजनांतर्गत, (०२)(०४) तापी पाटबंधारे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान, (४७०१ एच ७६३)" या लेखाशिर्षाखालील मंजूर अनुदानातून भागविण्यांत यावा.

३. या आदेशान्वये रुपांतरीत अस्थायी आस्थापनेवरील मुदतवाढ देण्यात येत असलेल्या पदांपैकी जे पदधारक दि.०१/०१/२०१८ ते दि. २८/०२/२०१८ या कालावधीत सदर पदावर कार्यरत राहतील, त्या दिनांकापर्यत सदर मुदतवाढ लागू राहील.

४. सदर आदेश शासन निर्णय, वित्त विभाग क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.०८/आ.पु.क., दिनांक ०८/०१/२०१८ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यांत येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०२०११६२९१४२२२७ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Vijendra Prabhakar Palwankar

Digitally signed by Vijendra Prabhakar Palwankar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7cb5ce90d018bdc109ad48f37ca4a3b06b0347375607bff9b7cc525c4c213e75, serialNumber=1525bd95a04e2d242eaa74f8dbc215ca88aa7bfb907686a9a62b37f3a74e5eba, cn=Vijendra Prabhakar Palwankar
Date: 2018.02.01 16:37:35 +05'30'

(वि.प्र.पालवणकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत:

१. महालेखापाल (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,
२. कार्यकारी संचालक,तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव.
३. मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव.
४. अधीक्षक अभियंता, धुळे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, धुळे.
५. कार्यकारी अभियंता, गिरणा नदी खोरे प्रकल्प विभाग,नाशिक.
६. कक्ष अधिकारी, आ. (प्रशि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

प्रत : मोप्र- कार्यासन संग्रहार्थ.